ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-III March 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मलमुत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क आणि स्त्री

**प्रा. प्रदीप दाजीबा पाटील**
समाजशास्त्र विभाग
श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
उमरगा ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
मो.नं. ९४२१३७४२८४

## प्रस्तावना :-

'मानवी हक्क' हा आजच्या प्रगत समजल्या जाणाऱ्या समाजात चर्चिला जाणारा एक महत्त्वाचा विषय आहे. सार्वत्रिकदृष्ट्या तो एक जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. कारण निसर्गतः प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा मिळालेला मूलभूत अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सर्वत्र होत असल्याने हक्काबाबत जागरुकता वाढते आहे. खरे तर 'जगा आणि जगू द्या' या प्रमुख सुत्रावर मानवाधिकार आधारभूत आहे. प्रामुख्याने निसर्गाकडून कोणत्याही प्रकारचा भेद केला जात नसताना मानवाकडून मात्र व्यक्तीच्या सन्मान्य जगण्याच्या स्वातंत्र्याचा हक्क मात्र हिरावून घेतला जात आहे. त्यामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.

युनो (UNO) व जगातील प्रमूख धर्मग्रंथानी असे प्रतिपादन केले आहे की 'जगातील सर्व मानसे समान आहेत व सर्वांना सन्मानाने जीवन जगण्याचा समान अधिकार आहे.' परंतू जगभरातील आजची प्राप्त परिस्थिती विसंगत व चिंताजनक बनलेली आहे. विशेषतः मानवी जीवनाचा एक प्रमूख घटक असलेल्या स्त्रीयांच्या बाबतीत तर तिच्या अनेक हक्कांची पायमल्ली होत असलेली दिसून येत आहे. प्रामूख्याने भारतासारख्या देशात प्राचीन काळापासून स्त्रीयांना दुय्यम स्थान देऊन तिला हक्क व अधिकारापासून वंचित ठेवलेले दिसते. भारतीय राज्यघटनेने प्रत्येकांना हक्क व अधिकार बहाल केलेले असून देखील स्वातंत्र्याच्या ६५ वर्षातही स्त्रियांना त्यापासून वंचित रहावे लागले आहे. दुर्देवाने आज २१ व्या शतकातही महिला आर्थिक, सामाजिक, मानसिक, शारीरिक गुलामगिरीच्या विळख्यात जखडलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना मुलभूत हक्क व अधिकार तर सोडाच परंतू साधे-साधे हक्क देखील मिळत नाहीत. त्यामुळे स्त्रीयांची कुचंबना, मानसिक गुलामगिरी वाढत आहे. परिणामी स्त्री स्वतःच्या हक्कापासून वंचित घटक बनल्याने विकासापासून आनखी बरीच दूर आहे असे म्हणता येईल.

'मानवी हक्क' म्हंटले की आपल्याला अनेक हक्क आठवतात. शिक्षणाचा हक्क, निवाऱ्याचा हक्क, रोजगाराचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, विचार करण्याचा हक्क मालमत्तेचा हक्क, इत्यादी हक्काची आपल्याला चटकण जाणिव होते. परंतु स्त्रीयांच्या मलमुत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्काकडे मात्र आपण दुर्लक्ष करतो. मलमूत्र विजर्सन करण्याचा सन्मान्य हक्क स्त्रियांना मिळालाच पाहीजे. तरच खऱ्या अर्थाने स्त्रीहक्कांचे संवर्धन होईल. परंतू भारतातील ग्रामीण व शहरी समाजातील स्त्रीयांच्या या हक्कांचा जर विचार केला तर फारच विदारक स्थिती दिसून येते. आज स्त्रियांना

अपमानजनक स्थितीत, अपराधी भावनेने व संकोचलेल्या अवस्थेत उघड्यावर मलमूत्र विजर्सन करावे लागते. त्यावेळी होणारा कोंडमारा, होणारी घालमेल असह्य असते. एकीकडे प्रगतीच्या गप्पा मारताना दुसरीकडे मात्र स्त्रियांना मग त्या निरक्षर असो किंवा साक्षर असो, मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्कापासून वंचित रहावे लागणे हे निश्चितच चिंताजनक आहे. त्यातून अनेक गंभीर समस्या व संकटे निर्माण होण्याची भिती व्यक्त होत आहे. त्यामुळे त्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रस्तूत शोधनिबंधात ''मलमूत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क आणि स्त्री'' या विषयांवर संशोधनात्मक दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टे :-

१. स्त्रीयांच्या मलमुत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्काचे स्वरुप समजून घेणे.
२. मलमूत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क आणि स्त्री आरोग्यांचा अभ्यास करणे.
३. मलमूत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क आणि वंचित स्त्रिया यावर उपाय सुचविणे.
४.

## गृहीतकृत्ये :-

१. स्त्रियांच्या मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्कांची स्थिती गंभीर आहे.
२. शहरी स्त्रियांच्या तूलनेत ग्रामीण स्त्रिया या हक्कापासून अधिक वंचित असल्याने त्यांचे आरोग्य खालावलेले आहे.
३. मलमुत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्कांपासून वंचित राहिल्याने अनेक सामाजिक समस्या व शारीरिक रोगांची निर्मिती होते.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तूत शोधनिबंधासाठी तथ्संकलन करताना दुय्यम स्वरुपाच्या तथ्यसामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल व इंटरनेट इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

## मानवी हक्कांचे स्वरुप :-

'मानवी हक्क' या संकल्पनेचा आज जगभर मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. कारण सर्वत्र मानवी हक्कापासून व्यक्तीला वंचित ठेवण्याचे प्रमाण वाढत आहे. खरे तर मानवाचा सर्वांगिण विकास हे कोणत्याही कल्याणकारी राज्याचे ध्येय असले पाहीजे. त्यासाठी मानवी हक्क व अधिकारांचे जतन व संवर्धन आवश्यक असते. मानवाधिकारातून स्वातंत्र्याची प्राप्ती होते व स्वातंत्र्याशिवाय जीवनाचा विकास होऊ शकत नाही असे 'लास्की' हा विचारवंत म्हणतो. प्रथम इंग्लंडमध्ये मॅग्नाचार्टा सनदेतून मानवीअधिकार मांडला गेला व नंतर युनो (UNO) ने यावर मुलभूत विचार करुन १० डिसेंबर १९४८ ला मानवी अधिकाराचा वैश्विक जाहीरनामा प्रकाशित केला आणि त्याच्या अंमलबजावणीकरिता मानव अधिकार आयोगाची स्थापना केली. या सर्व व्यवस्था उपलब्ध असूनही जगभर आणि विशेषत: भारतामध्येही स्त्रियांच्या हक्कांचे

हनन होत आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकार आणि चौथ्या भागात निती निर्देशक तत्त्वे समाविष्ठ करुन देखील त्याचे उल्लंघन होत असल्याने स्त्रियांवरील अन्याय व अत्याचारात वाढ झाली आहे. राज्यघटनेतील तिसरा भाग हा मूलभूत अधिकारांचा आहे. त्यातील कलम क्र. १२ ते ३५ हे मूलभूत अधिकारांचे स्वरुप विशद करणारे आहेत. परंतू आज समाजात जात, वर्ग, वंश, पंथ व लिंग भेद निर्माण करुन मानवी हक्कांचे हनन केले जात आहे.

## स्त्रियांच्या मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्काचे स्वरुप :-

भारतीय स्त्रियांच्या हक्कांच्या संदर्भात विचार केल्यास आजपर्यंत अनेक हक्कांच्या बाबतीत चर्चा झाल्याचे दिसून येते. परंतू नैसर्गिक विधी म्हणजेच मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्काबाबत फारशी चर्चा केली जात नाही. खरंच हा काही हक्क आहे का ? असा प्रश्न पडतो आणि तो साहजिकच आहे. स्वतःच्या सेल्फ कंटेण्ड फ्लॅट मध्ये चोवीस तास धो-धो पाणी ज्यांच्या शौचालयामध्ये वाहत आहे त्यांना कदाचित या विषयाचं महत्त्व लक्षात येणार नाही. पण आज जगामध्ये करोडो माणसांना सुरक्षित जागी मुलमुत्र-विसर्जन करण्याच्या सुविधेपासून वंचित राहावं लागतं. त्यांच्याघरीही शौचालय नसतं व त्यांना सार्वजनिक शौचालय देखील वापरायला मिळत नाही. परिणामी त्यांना अगदी उघड्यावर मलमुत्र विसर्जनास जाणं भाग पडतं. त्यामुळे अनेक प्रकारचे आजार निर्माण होत आहेत. शारीरिक व मानसिक आजार, दारिद्र्य, बालमृत्यूचे प्रमाण, स्त्रियांचे शिक्षण, आरोग्यांचे प्रश्न, पर्यावरणाचा शाश्वत विकास अशा आठ महत्त्वाच्या जागतिक समस्या शौचालयाच्या प्रश्नांशी निगडीत आहेत. म्हणजेच या मुलभूत सुविधेच्या अभावामुळे एकूण विकास प्रक्रियेतच अडथळा निर्माण होत आहे. हे लक्षात आल्यामुळेच 'युनो' च्या मानवाधिकार परिषदेने सप्टेंबर २०१० मध्ये सर्वांना पाणी व मलमुत्र विसर्जनाच्या सुविधा मिळण्याच्या तरतुदीचा समावेश मानवी हक्क कायद्यात केला आहे.

या कायद्यानुसार पिण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी सुरक्षित आणि पुरेशे पाणी तसेच मलमूत्रविसर्जनासाठीच्या सुविधा मिळणे हा आता सर्वांचा हक्क ठरला आहे. या हक्काची पुर्तता करता यावी म्हणून जागतिक पातळीवर निरनिराळ्या प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. पण मलमूत्र-विसर्जन ही माणसाची अतिशय खाजगी बाब मानली जाते. त्याबद्दल बोलणे निषिद्धच मानले जाते. म्हणूनच या विषयाबद्दल जाणी जागृती करण्यासाठी 'वॉटरसप्लाय ॲण्ड सॅनिटेशन कोलॅबोरेटिव्ह काऊन्सिल' तर्फे १९ नोव्हेंबर या दिवशी 'वर्ल्ड टॉयलेट डे' पाळला जातो. याबाबतीत भारतातील स्थिती देखील धक्कादायक अशीच आहे.भारतात आजही सुमारे ६० टक्के पेक्षा जास्त लोक उघड्यावर मलमूत्र विसर्जन करतात. ही अत्यंत शरमेची व खेदांची बाब आहे. भारतात घरी शौचालय असलेल्या लोकांपेक्षा हाती मोबाईल असलेल्या लोकांची टक्केवारी जास्त आहे. आज भारतापेक्षा गरीब समजल्या जाणाऱ्या बांग्लादेश, पाकिस्तान व अफगाणिस्तान मध्ये देखील मलमूत्र विसर्जनाच्या सुविधा अधिक चांगल्या असल्याचे जागतिक आकडेवारीत दिसून आले आहे.

जगातल्या सगळ्याच गरीब लोकांना या समस्येला तोंड द्याव लागत असलं तरी पुरुषापेक्षाही स्त्रियांना या समस्येचा त्रास खुपच मोठ्या प्रमाणावर सोसावा लागतो. कारण स्त्रियांना फक्त मलमूत्र विसर्जनासाठीच बंदिस्त स्वच्छतागृहांची गरज असते असे नाही तर गरोदरपणाच्या काळात आणि मासिक पाळी सुरु असताना देखील त्यांना खाजगीपणाची गरज असते. या काळात अस्वच्छ शौचालयात जावे लागले तर जंतूसंसर्गाचा धोका देखिल मोठ्या प्रमाणात असतो. असं म्हटलं

जात की, ''एखाद्या देशातल्या स्वच्छतागृहाची अवस्था पाहून त्या देशातल्या स्त्रियांच्या स्थितीचा अंदाज येऊ शकतो.'' या दृष्टीकोनातून पाहिले तर आपल्या देशात स्त्रियांची खूपच दुरावस्था आहे असे दिसून येते.

अस्वच्छ ठिकाणी किंवा उघड्यावर नैसर्गिक विधीसाठी जावे लागल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर तर अनेक दुष्परिणाम होतातच पण भारतासारख्या अनेक गरीब देशांमध्ये मुलीच्या शिक्षणावरही वाईट परिणाम होतात. युनिसेफ आणि अम्नेस्टी इंटरनॅशनल यासारख्या संस्थांनी केलेल्या पाहणीमध्ये असे दिसून आले आहे की, शिक्षणामधून मुलीच्या गळतीचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. शाळांमध्ये सुरक्षित स्वच्छतागृहांची उपलब्धता नसल्यामुळे मासिक पाळीच्या दिवसांत मुली शाळेत जायचे टाळतात. गैरहजेरीमुळे अभ्यासात मागे पडतात. आणि कधी-कधी या कारणांमुळे त्यांना शाळेत पाठवणेच टाळले जाते. १३ ते १८ या वयातल्या अनेक मुलींना ऋतूप्राप्तीनंतर वर्षातून साधारणपणे पन्नास दिवस शाळा बुडवावी लागते. असे दिसून आले आहे.

स्वच्छतागृहांच्या अभावी पुरुष दिवसांच्या कोणत्याही वेळी रस्त्यावर देखील मलमुत्र विसर्जनासाठी बसू शकतात. पण स्त्रियांना मात्र असं करता येत नाही.त्यामुळे ग्रामीण भागात स्त्रियांना पहाटे सुर्य उगवायच्या आत किंवा संध्याकाळी अंधार पडल्यावरच नैसर्गिक विधीसाठी जाता येते. अशा परिस्थितीमध्ये त्यांच्यावर जनावरे, कुत्रे, साप, विंचू इत्यादीचा हल्ला होण्याची शक्यता वाढते. त्याचबरोबर अंधारात शौचास जावे लागल्यामुळे अनेक स्त्रियांना लैंगिक अत्याचारालाही बळी पडावं लागलेलं आहे. शहरात देखील झोपडपट्टीत राहणाऱ्या कष्टकरी वर्गातल्या स्त्रियांना वस्तीसाठी असलेल्या सार्वजनिक शौचालयाची संख्या अपुरी असल्यामुळे लांबलचक रांगा लावाव्या लागतात. दिल्ली किंवा मुंबईसारख्या शहरामध्ये मध्यमवर्गीय स्त्रियासुद्धा मोठ्या प्रमाणात नोकरी धंद्यासाठी बराच काळ घराबाहेर राहतात. पण त्यांना वेळी-अवेळी सहज उपयोग करता येईल असे स्वच्छतागृह मात्र उपलब्ध नसते. दिल्लीसारख्या शहरात पुरुषांसाठी १५०० तर स्त्रियांसाठी फक्त १३२ सार्वजनिक शौचालये आहेत. तर मुंबईमध्ये पुरुषांसाठी असलेल्या सार्वजनिक शौचालयाची संख्या ही स्त्रीयांसाठीच्या स्वच्छतागृहापेक्षाही पाचपट जास्त आहेत. असे 'जेंडर ॲण्ड स्पेस' प्रकल्पात केलेल्या पाहणीत दिसून आले आहे. स्त्रियांसाठीची अनेक स्वच्छतागृहे दिवसा व रात्री नऊ नंतर अधिकृतपणे बंद होतात. अगदी रेल्वे प्लॅटफॉर्म वरच्या लेडीज टॉयलेटलाही चक्क कुलुप लावलेले असते. अशा स्थितीत स्त्रियांना बराच वेळ स्वत:ला रोखून धरावे लागते. त्यातच एखाद्या स्त्रीची मासिक पाळी चालू असेल किंवा एखादी स्त्री गरोदर असेल तर त्यांचे किती हाल होत असतील याची कल्पनाच न केलेली बरी. त्याचबरोबर अस्वच्छ स्वच्छतागृहात पाण्याअभावी अतोनात दुर्गंधी पसरलेली असते. अशा ठिकाणी जंतूसंसर्ग होईल म्हणून अनेक स्त्रिया सार्वजनिक शौचालयात जाण्याचेच टाळतात. किंवा दिवसभर पाणी पिण्याचे टाळतात. वर्षानुवर्षे अशा जीवन पद्धतीमुळे अनेक स्त्रियांना योनीमार्गाचे आजार, किडनीस्टोन सारखे भयंकर आजार होतात.

मुंबईसारख्या शहरात पुरुषांकरिता दोन हजारपेक्षा जास्त सार्वजनिक मुताऱ्या आहेत पण स्त्रियांसाठी एकही मुतारी नाही. विशेष म्हणजे पुरुषांना या मुताऱ्यांचा वापर फुकटात करता येतो पण स्त्रियांना मात्र मुतारीचा वापर करण्यासाठी सार्वजनिक शौचालयात जाताना पैसे द्यावे लागतात. म्हणून मुंबईतील स्त्रियांनी संघटीत होऊन 'राईट टू पी' म्हणजे मुत्रविसर्जनाचा हक्क नावाची चळवळ सुरु केली आहे. परंतू त्याला सरकार व राजकीय पक्षातर्फे अपेक्षित प्रतिसाद मिळालेला दिसून येत नाही. याशिवाय खेड्या-पाड्यांतील स्थिती देखील अत्यंत वाईट आहे. खेड्यांत अनेक स्त्रिया उघड्यांवर, रस्त्याच्या कडेला शौचास बसतात. रस्त्याने एखादी गाडी येताना दिसल्यास त्यांची जी तारंबळ उडते, जी केविलवानी स्थिती होते ते पाहून

अशा स्त्रियांना देखील सुरक्षित ठिकाणी मलमुत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क मिळायला हवा असे वाटल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा प्रश्न हा सन्मानाने मलमूत्र विसर्जनाच्या हक्काशी जोडलेला आहे. असे दिसून येते.

## उपाययोजना :-

जगातील विविध देशाबरोबरच भारतामध्येही स्त्री हक्कांचे हनन होत आहे. एक माणुस म्हणून जीवन जगण्यांचा हक्क तिला मिळाला पाहीजे. कोणत्याही प्रकारचा लिंगभेद न करता समता प्रस्तापित करण्यासाठी स्त्रीहक्कांचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे काही उपाययोजना सुचविता येतील.

१) स्त्रियांमध्ये मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्काबाबत जाणीव जागृती करणे.

२) शासनाने घर तेथे शौचालय ही योजना राबवावी.

३) शासनाने प्रत्येक खेडे व शहरांमध्ये सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यांची संख्या वाढवावी.

४) शासनाने स्त्रीबचत गटांच्या माध्यमातून शौचालय बांधकामासाठी अनुदान द्यावे.

५) शासनाने उघड्यावर मलमूत्र विसर्जन करणाऱ्यांना शिक्षा तर शौचालयांचा वापर करणाऱ्यांना सवलती द्याव्यात.

## समारोप :-

अशाप्रकारे मलमुत्र विसर्जनाचा सन्मान्य हक्क हा स्त्रियांचा एक मूलभूत हक्क आहे. खऱ्या अर्थाने स्त्रियांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी तिच्या या हक्काचे जतन व संवर्धन झाले पाहिजे. ती मलमूत्र विसर्जनाच्या सन्मान्य हक्कांपासून वंचित राहू नये. तिचे आरोग्य उत्तम दर्जाचे रहावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.त्यासाठी मानवी समाजाची मानसिकता बदलने ही काळाची गरज आहे.

## संदर्भ :-


१) डॉ. ज्योती लांजेवार (सुगावा प्रकाशन पुणे)- भारतीय समाज आणि स्त्री.

२) डॉ. सुधा काळदाते - भारतातील सामाजिक समस्या

३) ज्ञानदेव रावत - औरत त्रासदी का सच

४) प्रकाश नाटाणी - कन्या भ्रणहत्या और महिलाओं के प्रति घरेलू हिंसा

५) डॉ. सुधाराणी श्रीवास्तव- मानव अधिकार और महिला उत्पीडन

६) आ. ह. साळुंके - हिंदू संस्कृती आणि स्त्री

७) लोकप्रभा मासिक - २०१२

८) दैनिक लोकसत्ता, लोकमत, सकाळ, दिव्य मराठी इत्यादी